**फौ.कि.अर्ज.क्र. २३/२०२४**

**निशाणी कमांक १ खाली**
**फिर्यादी यांचे सत्यापन**
**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** — धनंजय पांडुरंग कासार, **वय** — ४४ वर्ष,
**व्यवसाय** — शेती,
**राहणार** — पलूस, ता. पलूस, जि. सांगली.

मी, सुरेखा आनंदा शिरतोडे, प्रदीप अशोक जाधव आणि आनंदा महादेव शिरतोडे यांच्याविरुध्द फिर्याद दाखल केली आहे. आनंदा शिरतोडे हे आमच्याकडे शेतात काम करण्यासाठी येत होते. आनंदा हे सुरेखा हिचे पती आहेत. सुरेखा शिरतोडे हिला पैशाची गरज होती. तिने मला तिची दोन गुंठे जमिन विकायची असे मला सांगितले होते. त्यानंतर तिच्यामध्ये आणि माझेमध्ये जमिनीचा व्यवहार ठरला. सदरचा व्यवहार हा दोन लाख सत्तर हजार रुपयांचा ठरला. मी सुरेखा हिला रु. एक लाख सत्तर हजार रोखीने दिले होते. दि. १०.०३.२०२३ रोजी साठेखत आणि मुखत्यारपत्र केले होते. एनए साठी मुखत्यारपत्र करुन घेतले होते. उर्वरित रक्कमेमधील एक लाख रुपयांचा चेक दिला होता. दि. २७.०२.२०२४ रोजी नगरपालिकेकडून लेआउटची कागदपत्रे प्राप्त झाली. त्यानंतर खरेदीपत्र करण्यासाठी ७/१२ उतारा काढला. सदर उता—यावरती सुरेखा शिरतोडे हिचे नाव कमी होवून प्रदीप अशोक जाधव याचे नाव नमूद असल्याचे दिसून आले. त्यानंतर प्रदीप जाधव यांच्या नावावर सदरची जमिन कशी झाली याबाबत मी फेरफार काढला. त्यावरुन मला असे समजले की, दि. ०३.१०.२०२३ रोजी सुरेखा हिने तिचा भाउ प्रदीप जाधव याच्यासोबत व्यवहार करुन त्याच्या नावावर दस्त करुन दिला. दि. २७.१०.२०२३ रोजी ७/१२ उता—यावर नोंद झाल्याचे दिसून आले. मी त्यानंतर सुरेखा यांच्याकडे सदर बाबीबाबत विचारणा केली असता तिने टाळाटाळ केली व तुम्हाला काय करायचे ते करा, असे म्हणाली. त्यावेळी मला असे लक्षात आले की, माझी फसवणूक झाली आहे. त्यानंतर माझी फसवणूक झाल्याबाबत पलूस पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. परंतु, पोलिसांनी माझे तक्रारीबाबत कोणतीही दखल घेतली नाही. म्हणून मी सदरची फिर्याद न्यायालयात दाखल केली. हाच माझा जबाब आहे.

..............................

साक्षीदाराची सही/अंगठा

समक्ष,

दिनांक १०.०६.२०२४.
पलूस.

PRANESHKUMAR BADRINATH BHARPURE

Digitally signed by PRANESHKUMAR BADRINATH BHARPURE
Date: 2024.06.10 16:59:28 +0530

(प्रा. बी. भरपुरे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, पलूस.

Scanned with OKEN Scanner